# जिल्हा परिषद, यवतमाळ
## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
## सामान्य प्रशासन विभाग
## जि.प. प्रशासकीय इमारत आर्णी रोड, यवतमाळ ४४५ ००१

दुरध्वनी क्रमांक -०७२३२-२४४४७१
ईमेल -:- dyceog_gad@yahoo.co.in संकेतस्थळ :- www.zpyavatmal.gov.in

क्रमांक/यजिप/साप्रवि/आस्था-४ /कावि-६५०/२०२६

सन २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांच्या अनुषंगाने लिपीक संवर्गातील कर्मचा-यांच्या वास्तव्य कालावधीच्या तात्पुरत्या जेष्ठता यादया प्रसिध्द करण्याबाबत.

वाचा :- १) शासन निर्णय(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४, दिनांक १५ मे २०१४
२) शासन शुध्दीपत्रक(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४, दिनांक २ जुलै, २०१४
३) शासन शुध्दीपत्रक (ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४, दिनांक २ जाने.२०१७
४) शासन पुरकपत्र(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४, दिनांक ७ मार्च २०१९
५) शासन पुरकपत्र(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४, दिनांक ८ मार्च २०१९
६) शासन पुरकपत्र क्रमांक/जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४ दिनांक २८ मार्च, २०२५
७) या कार्यालयाचे पत्र क्रमांक/यजिप/साप्रवि/आस्था-४/कावि-३६४/२०२६ दि.२६ फेब्रुवारी, २०२६

परिपत्रक

उपरोक्त संदर्भीय क्रमांक १ ते ६ अन्वये, सन-२०२६ मधील सर्वसाधारण बदल्याकरिता वास्तव्य सेवा जेष्ठता यादया तयार करण्यासाठी संदर्भीय क्रमांक ७ अन्वये,सा.प्र.वि.संवर्गातील गट-क कर्मचा-यांची सर्व विभाग व पंचायत समितीकडून माहिती मागविण्यात आली होती.त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सहाय्यक प्रशासन अधिकारी,कनिष्ठ प्रशासन अधिकारी,विस्तार अधिकारी(सां),वरिष्ठ सहाय्यक व कनिष्ठ सहाय्यक या संवर्गाच्या वास्तव्य सेवा जेष्ठता यादया तयार करुन,यवतमाळ जिल्हा परिषदेच्या www.zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सदर यादया सर्व कार्यालय प्रमुखांना ई-मेल व्दारेही पाठविण्यात येत आहे.

सर्व कार्यालय प्रमखांनी, सदर यादया यवतमाळ जिल्हा परिषदेच्या www.zpyavatmal.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्याची माहिती, सर्व संबधीतांना देण्यात यावी. या संबंधात कर्मचा-यांचे काही आक्षेप/हरकती असल्यास योग्य त्या पुराव्यासह दिनांक ०६ एप्रिल २०२६ पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

तसेच सदर तात्पुरत्या वास्तव्य जेष्ठता यादीतील कर्मचा-यांचे सेवाकालावधी व इतर बाबी तपासून त्यात काही त्रुटी आढळल्यास किंवा सुधारणा करावयाची असल्यास तसे दिनांक ०६ एप्रिल, २०२६ पर्यंत सामान्य प्रशासन विभागास योग्य त्या पुराव्यासह कळवावे.

स्वा/-
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद,यवतमाळ

प्रतिलीपी माहितीकरिता सादर-
१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,यवतमाळ
प्रत माहितीकरिता तसेच कार्यवाहीकरिता
२) खाते प्रमुख/विभाग प्रमुख (सर्व) जिल्हा परिषद,यवतमाळ
३) गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व)